जुलै २०२३

गोदातीर 15.07.2023

गोदातीर समाचार

# जिल्ह्यात २३६ गोवंशाना जीवनदान; गोवंशासंबंधी ६० गुन्हे दाखल

## नांदेड पोलीस दलाची कामगिरी



**नांदेड-** बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात गोवंश हत्या होऊ नये यासाठी नांदेड पोलिसांनी जिल्हाभरात नाकाबंदी राबविली होती. या नाकाबंदीत विविध पोलीस ठाण्यात ६० गुन्हे दाखल करून नांदेड पोलीस दलाने २३६ गोवंशांना जीवदान दिले.

जिल्ह्यात गोवंश संबंधाने प्राण्यांची अवैध वाहतुकीस आळा बसविण्यासाठी व जनावरांची अवैध वाहतूक करणाऱ्या गुन्हेगारांना अटक करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी नांदेड जिल्ह्यातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना दिल्या होत्या.

त्यानुसार जिल्ह्यातील पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्या अधिपत्यांखालील अधिकारी व अंमलदारांची पथके तयार करुन सूचना दिल्या होत्या.

सदर सूचनांच्या अनुषंगाने जिल्ह्यातील पोलीस स्टेशन हद्दीमध्ये महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ व प्राण्यांना क्रूरतेने वागविण्याचा प्रतिबंध - १९६० अधिनियामान्वये विविध ठिकाणी कारवाई करुन गुन्हेगारांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

जानेवारी २०२३ ते आजपावेतो एकूण ६० गुन्हे दाखल केलेले आहेत. सदर गुन्ह्यांतील १३५ आरोपीतांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच या कारवाईत नांदेड पोलीसांनी २३६ गोवंशाना जीवनदान दिले. तसेच ४० लाख ८२ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आणि ५६ वाहनांवर मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात आलेली आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, डॉ. खंडेराव धरणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांनी केली आहे.